जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 202
Times of India

# SUK awards researcher, author Dr Tara Bhawalkar

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Senior author, researcher, folk literature scholar and president of the 98th Akhil Bharatiya Marathi Sahitya Sanmelan Dr Tara Bhawalkar was honoured with Principal R K Kanbarkar Award, 2025 on Wednesday evening at Shivaji University, Kolhapur (SUK). The award consists of Rs1.51 lakh in cash, a memento and a shawl. Vice-chancellor Dr Digambar Shirke, Pro-vice-chancellor Dr Pramod Patil and registrar Dr V N Shinde were present on the occasion.

TOI



Dr Tara Bhawalkar at SUK on Wednesday

Chief guest, senior writer Dr Sadanand More said, "The aim of studying folklore is not only to study history but to understand tradition from a modern perspective. Tara Bhawalkar showed this through her study. She did an objective analysis on folk literature and culture creating pressure on past systems to include people"

Dr Bhawalkar announced that her library and collection of books now belong to SUK. She said, "If one has a good grasp of one's mother tongue, it is easy to use it effectively in any field. Universities should impart education not for degrees but to develop wisdom and students should take it in same spirit. There is a need to unblock stagnant flow of knowledge."

Expressing her love for Kolhapur, Dr Bhawalkar said that Kolhapur is a city of art. "Art forms like painting, sculpture, music, film and theatre flourished here. It is necessary to remember gratefully that the revolution of Rajarshi Shahu Maharaj raised the culmination of prosperity of Karveer Nagari, present Kolhapur," she said.

Vice-chancellor Dr Shirke said, "Dr Tara Bhawalkar... Her footprints are visible in literature as well as in activities like 'Maywatecha Magowa'."

Kanbarkar, after whom the award is named, was a social activist and vice-chancellor of SUK from 1980 to 1983. He was a frontline leader of several progressive movements in the city. He played an active role in the creation of the University Act in 1974.

10 APR 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाणपणा विकसित करण्यासाठी शिक्षण द्यावे

## डॉ. तारा भवाळकर : प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने शिवाजी विद्यापीठात सन्मान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : विद्यापीठांनी शिक्षण हे पदव्यांसाठी नव्हे, तर शहाणपणा विकसित करण्यासाठी द्यावे आणि विद्यार्थ्यांनीही ते त्याच भावनेने घ्यावे. ज्ञानाच्या क्षेत्रातले अवरुद्ध होत चाललेले प्रवाह अनिरुद्ध होण्यासाठी काम करण्याची गरज शिक्षण क्षेत्रात निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. भवाळकर यांना राजर्षी शाहू सभागृहात प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, १ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. भवाळकर म्हणाल्या, 'मातृभाषेवर उत्तम पकड असल्यास कोणत्याही क्षेत्रात तिचा प्रभावी वापर शक्य आहे. लोकसंचितातील अनुभवाचे साठे ज्ञानामध्ये वर्धित करण्यासाठी प्रयत्न केले. ते करताना परंपरानिष्ठ वातावरणात घडत असतानाही का आणि कशासाठी, हे प्रश्न विचारण्याची सवय जोपासल्याने आजची मी घडले.' डॉ. मोरे म्हणाले, 'लोकसाहित्याने आणि लोकसंस्कृतीने लोकांनाही सामावून घेण्याचा दबाव तत्कालीन व्यवस्थेवर निर्माण केला, म्हणून लोकांशी निगडित माहितीचे संकलन असणारा अथर्व चौथा वेद म्हणून सामावून घेतला गेला, याचे अत्यंत वस्तुनिष्ठ विश्लेषण ताराबाईंनी केले आहे. त्यांनी स्वतः मुक्त होऊन केलेले चिंतन म्हणूनच महत्त्वाचे आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'भारतीय लोकसंचिताचा डॉ. भवाळकर यांनी अत्यंत सूक्ष्मपणे, संवेदनशीलतेने वेध घेतलेला आहे. त्याच्या पाऊलखुणा त्यांच्या साहित्याबरोबरच 'मायवाटेचा मागोवा'सारख्या उपक्रमांतूनही उमटलेल्या आहेत.' प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. बी. पी. साबळे, अरुण कणबरकर, अविनाश सप्रे, बी. एम. हिर्डेकर, सुरेश शिपूरकर, प्रवीण चौगुले, भालबा विभूते, रणधीर शिंदे, प्रभंजन माने उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.




कोल्हापूर : लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी प्रदान करण्यात आला. यावेळी डावीकडून डॉ. बाबासाहेब खोत, पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, अरुण कणबरकर उपस्थित होते.

### 'माझा ग्रंथसंग्रह आता शिवाजी विद्यापीठाचा'

■ आपल्याकडील सर्व ग्रंथसंपदा शिवाजी विद्यापीठाला प्रदान करत असल्याची घोषणा डॉ. भवाळकर यांनी केली. 'माझा ग्रंथसंग्रह हा आता आपला आहे,' अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कोल्हापूरमध्ये नाटकाचे सादरीकरण करताना नेहमीच अभिमान आणि आनंद वाटला. डॉ. रा. कृ. कणबरकर यांच्या कारकीर्दीपासून विविध भूमिकांतून स्नेह वृद्धिंगत झाल्याचे त्यांनी सांगितले.

### एकेरी संबोधण्याने आदर कमी होत नाही

■ तंजावर, जिंजी, गोवन, कोकणी भाषेतील उदाहरणे देत डॉ. भवाळकर यांनी आई-वडिलांबाबत व्यक्त केले जाणारे प्रेम याची माहिती दिली. जो आपल्या अत्यंत जवळचा असतो, ज्याच्यावर प्रेम, अधिकार गाजवितो, त्यालाच आपण एकेरी भाषेने संबंधतो. त्याने आदर कमी होत नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडे, कवितांमधून हे अधोरेखित होते. त्यामुळे उगीच उसणे अवसान कशासाठी आणले जाते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

10 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाणपणा विकसित होण्यासाठी शिक्षण द्यावे

## लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांचे प्रतिपादन : प्राचार्य रा.कृ.कणबरकर पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठांनी शिक्षण हे पदव्यांसाठी नव्हे, तर शहाणपणा विकसित करण्यासाठी द्यावे आणि विद्यार्थ्यांनीही ते त्याच भावनेने घ्यावे. ज्ञानाच्या क्षेत्रातले अवरुद्ध होत चाललेले प्रवाह अनिरुद्ध होण्यासाठी काम करण्याची गरज शिक्षण क्षेत्रात निर्माण झाली आहे. व्यक्तीगत पातळीवर आदिमापासून ते अद्यतनापर्यंत जे सापडले, त्या लोकसंचितातील अनुभवाचे साठे ज्ञानामध्ये वर्धित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक तथा अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांना प्रदान करण्यात आला. यप्रसंगी सत्काराला



कोल्हापूर : लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांना प्राचार्य रा.कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान करताना डॉ. सदानंद मोरे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. मंचावर (डावीकडून) डॉ. बाबासाहेब खोत, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अरुण कणबरकर.

उत्तर देताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. शाल,श्रीफळ, १ लाख ५१ हजारचा धनादेश, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, मातृभाषेवर उत्तम पकड असल्यास कोणत्याही क्षेत्रात तिचा प्रभावी वापर करणे सहज शक्य होते. परंपरानिष्ठ वातावरणात घडत असतानाही का आणि कशासाठी, हे प्रश्न विचारण्याची सवय जोपासल्याने मी घडले. महाराष्ट्राने संशोधकीय परंपरेची द्रष्टेपणाने जोपासना केली पाहिजे. कोल्हापूर ही कलानगरी आहे. चित्र, शिल्प, संगीत, चित्रपट आणि नाट्य अशा सर्वच कला इथे फुलल्या. त्यामुळे कोल्हापूरमध्ये नाटकाचे सादरीकरण करताना नेहमीच अभिमान आणि आनंद वाटला. ही करवीरनगरीच्या समृद्ध आणि संपन्नतेचा कळस राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतीने चढविला आहे, याचे कृतज्ञ स्मरण बाळगणे आवश्यक आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे म्हणाले, डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या संशोधनातून लोकसाहित्यातील आदिमतेबरोबरच अद्यतनता अधोरेखित केली आणि लोकसाहित्याच्याअभ्यास, संशोधनाला व्यापक आयाम प्रदान केले. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे उद्दिष्ट हे केवळ इतिहासाचा अभ्यास करणे नव्हे, तर आधुनिक परिप्रेक्ष्यातून परंपरा समजून घेण्याचा अभ्यास आहे. ही बाब तारा भवाळकर यांनी त्यांच्या लोकसाहित्याच्या अभ्यासातून आणि संशोधनातून सिद्ध केली आहे. लोकसाहित्याने आणि लोकसंस्कृतीने लोकांनाही सामावून घेण्याचा दबाव तत्कालीन व्यवस्थेवर निर्माण केला, म्हणून लोकांशी निगडित माहितीचे संकलन असणारा अथर्व चौथा वेद म्हणून सामावून घेतला गेला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय लोकसंचिताचा डॉ. तारा भवाळकर यांनी अत्यंत सूक्ष्मपणे आणि संवेदनशीलतेने वेध घेतलेला आहे. त्यांच्या पाऊलखुणा त्यांच्या साहित्याबरोबरच 'मायवाटेचा मागोवा'सारख्या उपक्रमांतूनही उमटलेल्या आहेत. भवाळकर यांनी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू लोकविद्या केंद्राला पुढील दहा वर्षांच्या वाटचालीचा आराखडा आखून दिला आहे.

प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ.अरुण कणबरकर यांनी डॉ. तारा भवाळकर यांचा कणबरकर कुटुंबियांतर्फे सत्कार केला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. बी. पी. साबळे, प्रा. अविनाश सप्रे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. मालबा विभूते, डॉ. प्रभंजन माने, कणबरकर कुटुंबिय, आदी उपस्थित होते.

### 'माझा ग्रंथसंग्रह आता शिवाजी विद्यापीठाचा'

आपल्याकडील सर्व ग्रंथसंपदा शिवाजी विद्यापीठाला प्रदान करीत असल्याची घोषणा डॉ. तारा भवाळकर यांनी केली. 'माझा ग्रंथसंग्रह हा आता आपला आहे,' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### विठ्ठल, रामप्रमाणे माझा शिवाजी म्हणणे वावगे नाही

आपण नेहमी आपल्या जवळच्या व्यक्तींना ऐकेरी बोलतो. त्यांनी तंजावर, गोवा, कर्नाटक, महाराष्ट्रातील बोलीभाषेतील फरक सांगितला. आपल्य हृदयात असलेले राम, तुकाराम, विठ्ठल यांच्या आपला राजा छत्रपती शिवाजी महाराज यांनाही एकेरी बोलावणे वावगे नसल्याचेही त्यांनी सांगितले. शिक्षणाने माणूस साक्षर होतो पण वाचन, चिंतन,मनन केल्याने मानसाला शहाणपण येते. त्यामुळे इतिहासचे वाचन केले पाहिजे.

10 APR 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत



लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते बुधवारी प्रदान करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. बाबासाहेब खोत, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि डॉ. अरुण कणबरकर उपस्थित होते.

# सहकार चळवळीमुळे दक्षिण महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार

## डॉ. तारा भवाळकर : रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दक्षिण महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, सहकारी संस्था यांची चळवळ उभी राहिली. यातून खेड्यापाड्यात शिक्षण संस्था उभा राहिल्याने ग्रामीण भागातील तळागाळातील माणसाला सहजरीत्या शिक्षण उपलब्ध झाले. शिवाजी विद्यापीठ हे त्याचेच फलित आहे, या शब्दांत ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी बुधवारी दक्षिण महाराष्ट्रातील सहकाराचे महत्त्व अधोरेखित केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. भवाळकर यांना संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ज्ञानाच्या प्रवाहातील अडथळे दूर केले, तरच शिक्षणाचा विस्तार होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने हे अडथळे यापूर्वीच दूर केले आहेत. विद्यापीठांनी शिक्षण हे पदव्यांसाठी नव्हे, तर शहाणपणा विकसित करण्यासाठी द्यावे आणि विद्यार्थ्यांनीही ते त्याच भावनेने घ्यावे. जाती-पातीच्या पलीकडे जात आता भौगौलिक, प्रादेशिक भिंतीही कोलमडून टाकायला हव्यात. यावेळी डॉ. सदानंद मोरे, कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी डॉ. भवाळकर यांचा सत्कार केला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. बी. पी. साबळे, प्रा. अविनाश सप्रे उपस्थित होते.

### शाहू महाराजांचे कृतज्ञ स्मरण बाळगा

कोल्हापूर ही कलानगरी आहे. चित्र, शिल्प, संगीत, चित्रपट आणि नाट्य अशा सर्वच कला इथे फुलल्या. त्यामुळे कोल्हापूरमध्ये नाटकाचे सादरीकरण करताना नेहमीच अभिमान आणि आनंद वाटला. ही करवीरनगरीच्या समृद्ध आणि संपन्नतेचा कळस राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतीने चढविला आहे, याचे कृतज्ञ स्मरण बाळगणे आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

### उगीच उसने अवसान कशाला

आपल्याकडे टप्प्याटप्प्यावर भाषा बदलते. जो आपल्या अत्यंत जवळचा असतो त्यालाच आपण एकेरी भाषेने संबोधतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडे, कवितांमधून हे अधोरेखित होते. त्यामुळे उगीच उसने अवसान कशासाठी , असा सवाल करत डॉ. भवाळकर यांनी एकप्रकारे विद्यापीठाच्या नामविस्तारावर बोट ठेवले.

10 APR 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. तारा भवाळकर यांच्याकडून संशोधनाला व्यापक आयाम

## डॉ. सदानंद मोरे; शिवाजी विद्यापीठात प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान सोहळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या संशोधनातून लोकसाहित्यातील आदिमतेबरोबरच अद्यतनता अधोरेखित केली आणि लोकसाहित्याचा अभ्यास, संशोधनाला व्यापक आयाम प्रदान केले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. मोरे यांच्या हस्ते लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक तथा ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांना प्रदान करण्यात आला, यावेळी कार्यक्रमात ते बोलत होते.



कोल्हापूर : डॉ. तारा भवाळकर यांना शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान करताना डॉ. सदानंद मोरे आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

डॉ. भवाळकर यांना शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात डॉ. मोरे यांच्यासह कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते कणबरकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, रक्कम रु. १,५१,००० रुपयांचा धनादेश, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, लोकसाहित्याच्या अभ्यासाचे उद्दिष्ट हे केवळ इतिहासाचा अभ्यास करणे नव्हे, तर आधुनिक परिप्रेक्ष्यातून परंपरा समजून घेण्याचा अभ्यास आहे. ही बाब तारा भवाळकर यांनी त्यांच्या अवघ्या लोकसाहित्याच्या अभ्यासातून आणि संशोधनातून सिद्ध केली आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या, विद्यापीठांनी शिक्षण हे पदव्यांसाठी नव्हे, तर शहाणपणा विकसित करण्यासाठी द्यावे आणि विद्यार्थ्यांनीही ते त्याच भावनेने घ्यावे. ज्ञानाच्या क्षेत्रातले होत चाललेले प्रवाह अनिरुद्ध होण्यासाठी काम करण्याची गरज शिक्षण क्षेत्रात निर्माण झाली आहे.

कोल्हापूर ही कलानगरी आहे. चित्र, शिल्प, संगीत, चित्रपट आणि नाट्य अशा सर्वच कला इथे फुलल्या. करवीरनगरीच्या समृद्ध आणि संपन्नतेचा कळस राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतीने चढवला आहे, याचे कृतज्ञ स्मरण बाळगणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, भारतीय लोकसंचिताचा डॉ. तारा भवाळकर यांनी अत्यंत सूक्ष्मपणे आणि संवेदनशीलतेने वेध घेतलेला आहे. विद्यापीठाला त्यांनी ग्रंथसंपदा देण्याचा निर्णय घेतला, त्याचे स्वागत करतानाच विद्यापीठाच्या राजर्षी शाहू लोकविद्या केंद्राला त्यांनी पुढील दहा वर्षांच्या वाटचालीचा आराखडा आखून दिला, याबद्दलही त्यांचा कृतज्ञ आहे.

यावेळी पुरस्कार निवड समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी डॉ. तारा भवाळकर यांचा कणबरकर कुटुंबीयांतर्फे सत्कार केला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, माजी कुलगुरू माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, बी. पी. साबळे, प्रा. अविनाश सप्रे, बी. एम. हिर्डेकर, सुरेश शिपूरकर, प्रवीण चौगुले, भालबा विभूते, रणधीर शिंदे, प्रभंजन माने आदी उपस्थित होते.

### 'माझा ग्रंथसंग्रह आता शिवाजी विद्यापीठाचा'

आपल्याकडील ग्रंथसंपदा विद्यापीठाला प्रदान करत असल्याची घोषणा याप्रसंगी डॉ. तारा भवाळकर यांनी यावेळी केली. 'माझा ग्रंथसंग्रह हा आता आपला आहे', अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी यामध्ये कळीची भूमिका बजावल्याचेही त्यांनी नमूद केले.

10 APR 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दक्षिण महाराष्ट्रात सहकारामुळे शिक्षणाचा प्रचार

## डॉ. तारा भवाळकर : रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी संस्था, कारखाने यांची चळवळ उभा राहिली. त्यामुळेच ग्रामीण भागात शिक्षण संस्था स्थापन झाल्या. त्यामुळेच शेवटच्या घटकापर्यंत सहज शिक्षण उपलब्ध झाले. शिवाजी विद्यापीठ हे त्याचेच फलित आहे, असे प्रतिपादन अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या रा. कृ. कणबरकर पुरस्कार संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते डॉ. भवाळकर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, ज्ञानाच्या प्रवाहातील अडथळे दूर झाल्याशिवाय शिक्षणाचा विस्तार होणार नाही. शिवाजी विद्यापीठाने हे अडथळे यापूर्वीच दूर केले आहेत. विद्यापीठांनी शिक्षण हे पदव्यांसाठी नव्हे, तर शहाणपणा विकसित करण्यासाठी द्यावे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. तारा भवाळकर यांना प्रदान करताना डॉ. सदानंद मोरे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. बाबासाहेब खोत, पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अरुण कणबरकर आदी.** (छाया : मिलन मकानदार)

### विद्यापीठाने विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनविले

मुंबई, पुणे विद्यापीठ हे सर्वश्रेष्ठ, तर शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी म्हणजे दुय्यम समजला जायचा; पण शिवाजी विद्यापीठाने ज्ञानार्जनाने विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनविले. कोल्हापूर ही कलानगरी आहे. चित्र, शिल्प, संगीत नाट्य आणि चित्रपट क्षेत्रांतील कलेचा जन्म येथे झाला. या समृद्धतेवर राजर्षी शाहू महाराज यांनी कळस चढविला, असेही डॉ. भवाळकर म्हणाल्या.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, डॉ. तारा भवाळकर यांनी लोकसाहित्याच्या अभ्यास, संशोधनाला व्यापक आयाम प्रदान केला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय लोकसंचिताचा डॉ. भवाळकर यांनी अत्यंत सूक्ष्मपणे वेध घेतलेला आहे. प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी स्वागत केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी डॉ. भवाळकर यांचा कणबरकर कुटुंबीयांतर्फे सत्कार केला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. प्र. कुलगुरू पी. एस. पाटील, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. बी. पी. साबळे, प्रा. अविनाश सप्रे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 APR 2025
पुण्यनगरी

# जाधव गुरुजींच्या निरुपणाने तुकाराम गाथा अभ्यास परंपरा समृद्ध

## डॉ. सदानंद मोरे : पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील व सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्काराचे वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मारुतीराव जाधव-तळाशीकर गुरुजींच्या गाथेचे प्रकाशन होणे ही फार मोठी आणि महत्त्वाची गोष्ट आहे. जाधव गुरुजींच्या निरूपणाने तुकाराम गाथेच्या अभ्यासाची परंपरा समृद्ध केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित २०२४ साठीचा पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार बुधवारी प्रदान करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित २०२४ साठीचा पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार आणि सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार वितरण सोहळा विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. मोरे म्हणाले, या गाथेचा प्रचार आणि प्रसार हळूहळू संपूर्ण राज्यभर होणार आहे, ही सुखावणारी गोष्ट आहे. महाराष्ट्राबाहेर उत्तर प्रदेशातील कानपूरमधील आय.आय.टी.सारख्या आधुनिक वैज्ञानिक संस्थेमध्ये कार्य करीत असताना तुकोबांच्या अभंगाचा सखोल विचार करून डॉ. समीर चव्हाण यांनी खंड प्रकाशित करून पुरस्कार प्राप्त केलेला आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षीय मनोगतामध्ये म्हणाले, संत साहित्यामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल स्व. तळाशीकर गुरूजी यांना पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर सद्गुरू डॉ. मुंगळे हे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे अध्यात्मिक गुरू, असा हा गुरु-शिष्यांच्या नावाचा पुरस्कार दिला जात आहे, हा दुग्धशर्करा योग आहे.

सुरुवातीस पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील पुरस्कार स्व.तळाशीकर गुरुजी यांच्या वतीने आनंदी मारुतीराव जाधव यांनी स्वीकारला, तर सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार आय.आय.टी. कानपूर, उत्तर प्रदेश येथील प्रा. समीर चव्हाण यांना डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी गौरी कहाते (सोलापूर), डॉ. अरुण जाधव (तळशी), माजी खा. प्रा. संजय मंडलिक, डॉ. प्रतापराव माने, अरुण डोंगळे, तळशीकरवासीय आदी उपस्थित होते.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक, तर डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 APR 2025

तरुण भारत

# जाधव गुरूजींच्या गाथेचा प्रचार, प्रसार राज्यभर होणार

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन : साहित्य पुरस्कार वितरण सोहळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

मारूतीराव जाधव (तळाशीकर) गुरूजींच्या गाथेचे प्रकाशन होणे ही फार मोठी आणि महत्वाची गोष्ट आहे. या गाथेचा प्रचार आणि प्रसार हळूहळू संपूर्ण राज्यभर होणार आहे, ही सुखावणारी गोष्ट आहे. कारण जाधव गुरूजींच्या निरूपणाने तुकाराम गाथेच्या अभ्यासाची परंपरा समृध्द केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्यावतीने आयोजित पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार आणि सदगुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्वज्ञान साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी छत्रपती शाहू सभागृहामधील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. पद्मश्री डॉ. डी. वाय.पाटील पुरस्कार स्व.तळाशीकर गुरूजी यांच्यावतीने श्रीमती आनंदी मारूतीराव जाधव यांनी स्विकारला. तर, सदगुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्वज्ञान साहित्य पुरस्कार आय. आय. टी.कानपूर उत्तर प्रदेश येथील प्रा.समीर चव्हाण यांना प्रदान करण्यात आले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सदगुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्वज्ञान साहित्य पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे व कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्विकारताना प्रा. समीर चव्हाण. सोबत डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे, गौरी कहाते आदी.**

डॉ. मोरे म्हणाले, महाराष्ट्राबाहेर उत्तर प्रदेशातील कानपूरमधील आय. आय. टी. सारख्या आधुनिक वैज्ञानिक संस्थेमध्ये कार्य करीत असताना तुकोबांच्या अभंगाचा सखोल विचार करून डॉ. समीर चव्हाण यांनी खंड प्रकाशित करून पुरस्कार प्राप्त केलेला आहे. संत नामदेव, संत तुकोबा, संत एकनाथ महाराज यांनी संत परंपरा कायम ठेवली. विज्ञान, कला, भाषा साहित्य अशा सर्व प्रकारच्या लोकांना तुकोबा महाराज आकृष्ट करू शकतात. तुकाराम महाराज हयात असतानाच त्यांच्या अभंगाचा महाराष्ट्रावर फार मोठा प्रभाव पडला होता. त्या परंपरेमध्ये समाविष्ट होणारे तळाशीकर गुरूजी आणि सदगुरू डॉ. मुंगळे यांच्या कार्याची दखल शिवाजी विद्यापीठाने घेतली हे अधिक कौतुकास्पद आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संत साहित्यामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल स्व. तळाशीकर गुरूजी यांना पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार प्रदान करण्यात आले. तर, सद्गुरू डॉ. मुंगळे हे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे अध्यात्मिक गुरू असा हा गुरू–शिष्यांच्या नावाचा पुरस्कार दिला जात आहे, हा दुग्धशर्करा योग आहे.

याप्रसंगी गौरी कहाते, डॉ.अरूण जाधव, डॉ.समीर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी खासदार प्रा. संजय मंडलीक, डॉ.प्रतापराव माने, अरूण डोंगळे सद्गुरू डॉ.गुरूनाथ मुंगळे आणि पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांचे कुटुंबीय आदी उपस्थित होते. संत तुकाराम अध्यासनाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

10 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जाधव गुरुजींच्या गाथेचे प्रकाशन ही महत्त्वाची गोष्ट : डॉ. सदानंद मोरे

## विद्यापीठात आनंदी जाधव, समीर चव्हाण यांना पुरस्कार प्रदान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजींच्या गाथेचे प्रकाशन होणे ही फार मोठी, महत्त्वाची गोष्ट आहे. या गाथेचे प्रचार-प्रसार हळूहळू संपूर्ण राज्यभर होणार आहे, ही सुखावणारी गोष्ट आहे. जाधव गुरुजींच्या निरुपणाने तुकाराम गाथेच्या अभ्यासाची परंपरा समृद्ध केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार दिवंगत तळाशीकर गुरुजी यांच्यावतीने आनंदी मारुतीराव जाधव यांना, तर सद्गुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार कानपूर आयआयटीमधील प्रा. समीर चव्हाण यांना डॉ. मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. मोरे म्हणाले, 'आयआयटीमध्ये असताना तुकोबांच्या अभंगाचा सखोल विचार करून डॉ. समीर चव्हाण यांनी खंड प्रकाशित करून पुरस्कार प्राप्त केला. विज्ञान, कला, भाषा साहित्य अशा सर्व क्षेत्रातील लोकांना तुकोबा महाराज आकृष्ट करू शकतात. एवढे सामर्थ्य त्यांच्या गाथेमध्ये आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'तळाशीकर गुरुजी आणि डॉ. गुरूनाथ मुंगळे पुरस्कार प्राप्त डॉ. चव्हाण या दोघांचा केंद्रबिंदू एकच आहे. ते म्हणजे संत तुकाराम महाराज. या दोघांनीही तुकाराम महाराज समजावून सांगण्यामध्ये भर घालण्याचे काम केले आहे. माजी खासदार प्रा. संजय मंडलिक, डॉ. प्रताप माने, अरुण डोंगळे आदी उपस्थित होते. संत तुकाराम अध्यासनाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार आनंदी जाधव यांना, तर सदगुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार प्रा. समीर चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. यावेळी डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, व्ही. एन. शिंदे, गौरी कहाते, पी. एस. पाटील, अरुण जाधव, रणधीर शिंदे उपस्थित होते.

### आठवणीने भावुक

■ या कार्यक्रमात गौरी कहाते, डॉ. चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अरुण जाधव आणि आनंदी जाधव या मनोगत व्यक्त करताना तळाशीकर गुरुजींच्या आठवणीने भावुक झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2025
लोकमत




शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने २०२४ साठीचा पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार स्व. मारुतीराव जाधव यांना प्रदान करण्यात आला. डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते आनंदी मारुतीराव जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला.

# जाधव गुरुजींच्या निरूपणाने तुकाराम गाथा अभ्यास समृद्ध

## डॉ. सदानंद मोरे : डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. गुरुनाथ मुंगळे पुरस्काराचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजींच्या निरूपणाने तुकाराम गाथेच्या अभ्यासाची परंपरा समृद्ध केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने २०२४ साठीचा पहिला डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार स्वर्गीय मारुतीराव जाधव यांना प्रदान करण्यात आला. यावेळी सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार प्रा. समीर चव्हाण यांना देण्यात आला. स्व.तळाशीकर गुरुजी यांच्या वतीने आनंदी मारुतीराव जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला. विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. मोरे म्हणाले, मारुतीराव जाधव यांच्या गाथेचे प्रकाशन होणे ही फार मोठी आणि महत्त्वाची गोष्ट आहे. या गाथेचे प्रचार आणि प्रसार हळूहळू संपूर्ण राज्यभर होणार आहे, ही सुखावणारी गोष्ट आहे. विज्ञान, कला, भाषा साहित्य, अशा सर्वप्रकारच्या लोकांना तुकोबा महाराज आकृष्ट करू शकतात. एवढे सामर्थ्य त्यांच्या गाथेमध्ये आहे.

यावेळी गौरी कहाते (सोलापूर), डॉ. अरुण जाधव (तळाशी), डॉ. समीर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी खासदार प्रा. संजय मंडलिक, डॉ. प्रतापराव माने, अरुण डोंगळे यांच्यासह पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

10 APR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जाधव गुरुजींच्या निरूपणाने तुकाराम गाथेची परंपरा समृद्ध : डॉ. मोरे

## डॉ. डी. वाय. पाटील व डॉ. गुरुनाथ मुंगळे साहित्य पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मारुतीराव जाधव (तळाशीकर) गुरुजींच्या निरूपणाने तुकाराम गाथेच्या अभ्यासाची परंपरा समृद्ध केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार आणि सद्गुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार वितरण सोहळा विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहामध्ये झाला, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार कै. जाधव गुरुजी यांच्या वतीने श्रीमती आनंदी मारुतीराव जाधव यांनी स्वीकारला. तर सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार आय.आय.टी. कानपूर (उत्तर प्रदेश) येथील प्रा.समीर चव्हाण यांना डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.




**कोल्हापूर : पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते स्वीकारताना श्रीमती आनंदी मारुतीराव जाधव. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

डॉ. मोरे म्हणाले, मारुतीराव जाधव गुरुजींच्या गाथेचे प्रकाशन होणे महत्त्वाची गोष्ट आहे. या गाथेचा प्रचार आणि प्रसार राज्यभर होणार आहे, ही सुखावणारी गोष्ट आहे. संत परंपरेत समाविष्ट होणारे जाधव गुरुजी आणि सद्गुरू डॉ. मुंगळे यांच्या कार्याची दखल शिवाजी विद्यापीठाने घेतली हे कौतुकास्पद आहे. कानपूरमधील आय.आय.टी.सारख्या आधुनिक वैज्ञानिक संस्थेमध्ये कार्य करीत असताना तुकोबांच्या अभंगाचा सखोल विचार करून डॉ. समीर चव्हाण यांनी खंड प्रकाशित करून पुरस्कार प्राप्त केलेला आहे.

माजी खासदार प्रा. डॉ.प्रतापराव माने, अरूण डोंगळे यांच्यासह अधिकार मंडळाचे सदस्य उपस्थित होते. संत तुकाराम अध्यासनाचे प्रमुख डॉ.नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी आभार मानले.

10 APR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या मूल्यचौकटीचा वारसा

## डॉ. राधेश्याम जाधव : 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांनी प्रदान केलेल्या मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुनःपुन्हा अधोरेखित करीत राहून त्याची नव्याने मांडणी करीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. राधेश्याम जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर बोलत होते.अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. मास कम्युनिकेशन विभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभली.

डॉ. राधेश्याम जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. यामध्ये कोणत्याही स्वरुपाच्या भेदभावाला थारा नव्हता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली आणि त्यांनी माहितीच्या पलीकडे जाऊन ज्ञानाच्या निर्मितीवर भर दिला.



डॉ. शिवाजी जाधव यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत व परिचय करून दिला. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पांढरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला डॉ. शरद बनसोडे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे.के. पवार, इंद्रजीत सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जी.बी. कोळेकर, वसंतराव मुळीक, वासुदेव कुलकर्णी, सचिन सूर्यवंशी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. नितीन माळी, शशिकांत पंचगल्ले, उमेश सूर्यवंशी, डॉ. अरुण शिंदे, जयसिंग पाटील, गुरुबाळ माळी, चारुदत्त जोशी, डॉ. श्रीरंग गायकवाड, राजेंद्रकुमार चौगुले, कृष्णात जमदाडे, डॉ. रत्नाकर पंडित, तेजा दुर्वे, गणेश खोडके उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2025

पुण्यनगरी

# पदवी स्तरावरील परीक्षा घेण्यास विद्यापीठ सक्षम : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ पदवी स्तरावरील प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी सक्षम आहे. विद्यापीठच परीक्षा घेणार आहे. तरीही महाविद्यालये परीक्षा घेण्याचा आग्रह करीत असल्याने ११ एप्रिल रोजी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

पदवी प्रथम, द्वितीय परीक्षा यापूर्वी विद्यापीठाकडून घेतल्या जात होत्या. काही महाविद्यालयांनी यास विरोध केला आहे; परंतु या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाने काढल्या असून, परीक्षा घेण्यावर परीक्षा विभाग ठाम आहे. डिजिटायजेशनमुळे हे बनावट प्रमाणपत्र बनवण्याचे प्रकार वाढले आहेत. विद्यापीठाने यासंदर्भात प्रकार उघडकीस आल्यावर पोलिसांत गुन्हे दाखल केले आहेत. केंद्र सरकारच्या धोरणानुसार 'नॅड' पोर्टलवर शिवाजी विद्यापीठाने २००० पासून सुमारे ११ लाखांहून अधिक पदवीसह इतर प्रमाणपत्रे अपलोड केली आहेत. या पोर्टलवरील प्रमाणपत्रामध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड करता येत नाही.

10 APR 202

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एस. के. पाटील महाविद्यालयाचे देश विकासात घटक बनण्याचे कार्य

■ प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

प्रतिनिधी

कुरुंदवाड

स्पर्धा परीक्षा केंद्र, होम सायन्स, नावलौकिक मिळवलेला क्रीडा विभाग या माध्यमातून एस. के. पाटील महाविद्यालय देशाच्या विकासाचे घटक बनण्याचे काम उत्कृष्टपणे करत आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी काढले.

येथील सहकार भूषण एस. के. पाटील महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक रामचंद्र मोहिते होते.




कुरुंदवाड : एस. के. पाटील महाविद्यालयात पारितोषिक वितरणप्रसंगी बोलताना प्र. कुलगुरू पी. एस. पाटील, व्यासपीठावर मान्यवर.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, भारतीय पदार्थापासून तयार केलेला पिझ्झा अमेरिकेत प्रसिद्ध झाला पाहिजे हे ध्येय ठेवले पाहिजे यासाठी कोणतेही व्यवसायाचे पॅशन हवे. यासाठी पेशन्स ठेवले पाहिजेत तरच आपण यशस्वी होऊ शकतो यासाठी संशोधन वृत्ती जोपासली पाहिजे. तसेच सोशल मीडियामुळे आपण जगाशी बोलतो मात्र आपण स्वत:शी बोलत नाही हे दुर्दैव आहे. सध्या आपला देश विकसनशील देशात मोडतो. २०४७ पर्यंत आपला देश विकसित होण्यासाठी सर्वांनी हातभार लावला पाहिजे, असे आवाहनही केले.संचालक विजयभाऊ पाटील, रामचंद्र मोहिते, सतीश माने, चंद्रकांत मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत प्रास्ताविक डॉ. सुनील चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य एस. एस. दबडे यांनी करून दिला. शैक्षणिक क्षेत्राचा आढावा प्रभारी प्राचार्य आर. एस. कदम यांनी सादर केला. सूत्रसंचालन संदीप सावगावे यांनी केले. आभार उपप्राचार्य व्ही. एस. मून यांनी मानले. कार्यक्रमाला संजय पाटील, अजित देसाई, सुनील चव्हाण, एस. आर. सावगावे, मान्यवर, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2025

सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी प्रा. दत्ता भगत लिखित पुस्तकाचे प्रकाशन डॉ. गिरीश मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी डॉ. पी. एस. कांबळे, श्रीकृष्ण महाजन, अविनाश भाले उपस्थित होते.

# देश, व्यक्ती समूहाच्या स्वातंत्र्यात डॉ. आंबेडकरांनी समतोल साधला

## डॉ. गिरीश मोरे : फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाला प्रारंभ

कोल्हापूर, ता. ९ : भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्र निर्माणामध्ये देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच व्यक्ती समूहाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे समजून या दोन्हीमध्ये समतोल साधण्याचे कार्य केले, असे प्रतिपादन डॉ. गिरीश मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित 'फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहा'च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी या संशोधन केंद्राचे प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. प्रा. दत्ता भगतलिखित 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रा. डॉ. पी. एस. कांबळे म्हणाले, 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे असलेले योगदान प्रा. भगत यांनी या पुस्तकातून सर्वांसमोर मांडले आहे.' डॉ. महाजन म्हणाले, 'बाबासाहेबांचा लढा हा भारतीयांच्या मानवी हक्कांसह संपूर्ण स्वातंत्र्याचा होता. त्यांनी संविधान निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले.'

डॉ. चंद्रकांत कुरणे, अनमोल कोठडिया, टी. एस. कांबळे, प्रा. साठे उपस्थित होते. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.